# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २०९** **दिनांक :- ०४/०८/२०२१**

**कोवीड-१९ च्या अनुषंगाने आस्थापनांच्या निर्बंध शिथिलतेबाबत कलम १४४ प्रमाणे आदेश जारी.**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मिरा-भाईंदर महानगर पालिका क्षेत्राकरिता श्री. विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तालय यांनी आस्थापना चालू ठेवण्यासंदर्भात दिनांक ०३/०८/२०२१ रोजी पासुन पुढील आदेश लागू केलेले आहेत.

१. सर्व अत्यावश्यक सेवेची दुकाने आठवड्यातील सर्व दिवस रात्री १०.०० वा. पर्यंत चालू राहतील.
२. अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने व आस्थापना सोमवार ते शनिवार रात्री १०.०० वा.पर्यंत चालू राहतील व रविवारी बंद राहतील. मात्र शॉपींग मॉल्स पुर्णतः बंद राहतील.
३. मेडीकल व केमिस्ट शॉप्स सर्व दिवस पूर्ण वेळ चालू राहतील.
४. उपहारगृहे/हॉटेल्स/रेस्टॉरंन्ट हे सोमवार ते शनिवार दुपारी १६.०० वाजे पर्यंत हॉटेलच्या बैठकीच्या क्षमतेच्या ५० टक्के क्षमतेने सुरु राहतील व रविवारी बंद राहतील. केवळ पार्सल/टेक अवे आणि होम डिलेवरी सुविधा सर्व दिवस नियमीत वेळे प्रमाणे चालू राहील.
५. व्यायाम शाळा, योगा-वर्ग, केश कर्तनालये, ब्युटी पार्लर ईत्यादी व स्पा ५० टक्के एवढया क्षमतेने सोमवार ते शनिवार रात्री १०.०० वा.पर्यंत सुरु राहतील आणि रविवारी बंद राहतील.
६. जलतरण तलाव आणि निकट संपर्क येऊ शकतो असे क्रिडा प्रकार वगळून अन्य इनडोअर व आऊटडोअर खेळांस संबधित महानगरपालिका/नगरपालिका/स्थानिक प्राधिकरण यांनी नियमित केलेल्या वेळेनुसार परवानगी असेल.
७. सार्वजनिक उद्याने, खेळाची मैदाने हे केवळ व्यायाम, चालणे, धावणे व सायकलिंग यांकरीता सकाळी ०५.०० ते सकाळी ०९.०० वाजे पर्यंत चालू राहतील.
८. सर्व कृषि विषयक सेवा, बांधकाम उदयोग, औद्योगिक सेवा, मालवाहतूक सेवा नियमित पणे चालू राहतील.
९. सर्व सिनेमागृहे, नाटयगृहे, मल्टीप्लेक्स (स्वतंत्र आणि मॉल्समधील) पुढील आदेशा पर्यंत बंद राहतील.
१०. सर्व प्रकारची धार्मिक स्थळे पुढील आदेशा पर्यंत बंद राहतील.
११. चित्रीकरण नियमित वेळे नुसार करण्यास परवानगी असेल.

वरील शिथील केलेल्या निर्बंधांव्यतिरिक्त शासनाकडील दि. ०४/०६/२०२१ रोजीचे आदेशातील स्तर-३ (Level-3) चे खालील निर्बंध संपूर्ण मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्राकरीता पुढील आदेशापर्यंत पूर्ववत लागू करण्यात आलेले आहेत.

उपनगरीय लोकल वाहतूकीबाबत बृहन्ममुंबई महानगरपालिकेने निर्गमित केलेले आदेश नियमीत लागू असून सामाजिक/राजकीय/सांकृतिक मेळावे, निवडणुका, निवडणूक प्रचार, निवडणूक बैठका हया ५०% बैठक क्षमतेने सोमवार ते शुक्रवार सायं. ०४.०० वा. पर्यंत घेता येतील. त्याचप्रमाणे लग्न समारंभ ५० लोकांच्या मर्यादेतच करण्यास परवानगी असून अत्यंसंस्कार विधी फक्त २० लोकांच्या उपस्थितीमध्ये करता येईल. तसेच ई-कॉमर्स सेवा पूर्वीप्रमाणे नियमित सुरु ठेवण्यात आल्या असून सार्वजनिक परिवहन सेवा १००% क्षमतेने सुरु राहतील. मात्र प्रवांशाना उभे राहून प्रवास करता येणार नाही.

----oooo----